सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास
स्वररंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/४७२ दिनांक : १०/०३/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित

**पुणे शहरातील महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**

**विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.**

**विषय : पुणे महानगरपालिकेमार्फत आयोजित प्लास्टिक बॉटल्स संकलन स्पर्धेस मुदतवाढीबाबत...**

**संदर्भ : घकव्यका/६४७३ दिनांक २८/०२/२०२३ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, पुणे शहरातील प्लास्टीक कचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने योग्य माहिती, शिक्षण, संवाद याद्वारे दैनंदिन वापरातील प्लास्टिकच्या वस्तूंचा त्याग करण्याच्या दृष्टीने नागरिकांमध्ये जनजागृती करणे, पर्यायी जैवविघटनशील पदार्थ (जूट, कापड इ.) यांच्या वापरास प्रोत्साहन देणे व संकलन या उद्देशाने पुणे महानगरपालिकेमार्फत प्लास्टिक बॉटल्स संकलन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा कालावधी दि. ०१ फेब्रवारी ते २८ फेब्रवारी, २०२३ असा निश्चित करण्यात आला होता. परंतू अधिकाधिक मुलांनी या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे याकरिता सदर स्पर्धेचा कालावधी दि. १५ मार्च, २०१३ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. आपल्या महाविद्यालय/ परिसंस्था / विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

सोबत : १. वरीलप्रमाणे

डॉ. संतोष परचुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- घकव्यका/६४७३
दिनांक :- २८/०२/२०२३

मा. कुलगुरु कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 01 MAR 2023
आवक क्रमांक 1590
जावक दिनांक 02 MAR 2023

प्रति,
मा.कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे.

विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक क्र. 329
08 MAR 2023

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
02 MAR 2023
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 1638
जावक दिनांक: 6-3-23

यांस...

**विषय :- पुणे महानगरपालिकेमार्फत आयोजित प्लास्टिक बॉटल्स संकलन स्पर्धेस दिनांक १५/०३/२०२३ पर्यंत मुदतवाढ दिलेबाबत.**

पुणे शहरातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने योग्य माहिती, शिक्षण, संवाद यद्वारे दैनंदिन वापरातील प्लास्टिकच्या वस्तुंचा त्याग करण्याच्या दृष्टीने नागरिकांमध्ये जनजागृती करणे, पर्यायी जैवविघटनशील पदार्थ (जूट, कापड इ.) यांच्या वापरास प्रोत्साहन देणे व संकलन मोहिमेद्वारे शहरातील प्लास्टिक कच-याचे संकलन करणे या उद्देशाने पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालय स्तरावर प्लास्टिक बॉटल्स संकलन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून एकूण ७५ आरोग्य कोठ्यावर प्लास्टिक बॉटल्स संकलित करण्यात येत आहेत. ही स्पर्धा वैयक्तिक (सर्व वयोगटातील नागरिक), शैक्षणिक संस्था (शाळा/महाविद्यालये) व संस्थात्मक (गृहनिर्माण संस्था/ व्यावसायिक आस्थापना/स्वयंसेवी संस्था/ खाजगी संस्था/ गणेश मंडळे इ.) अशा तीन गटांमध्ये घेण्यात येत आहे.

या स्पर्धांचा कालावधी दिनांक ०१/०२/२०२३ ते २८/०२/२०२३ असा निश्चित करण्यात आलेला होता. परंतु अधिकाधिक नागरिक, शाळा/महाविद्यालये व संस्थांनी या स्पधेमध्ये सहभागी व्हावे याकरीता सदर स्पर्धांना दिनांक १५/०३/२०२३ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर स्पर्धांच्या अनुषंगाने शहर पातळीवर एकूण तीन भव्य बक्षिसे आणि प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय स्तरावर प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांसाठी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत.

| शहर पातळीवर देण्यात येणारे भव्य बक्षिस | | | |
|---|---|---|---|
| | वैयक्तिक | शैक्षणिक | संस्थात्मक |
| **भव्य बक्षिस** | ई-बाईक | म्युझिक इन्स्ट्रुमेन्ट्स सेट | ओपन जिम सेट |

| क्षेत्रिय कार्यालय स्तरावर देण्यात येणारे गटनिहाय बक्षिस | | | |
|---|---|---|---|
| | वैयक्तिक | शैक्षणिक | संस्थात्मक |
| **प्रथम क्रमांक** | स्पोर्ट सायकल | डेस्कटॉप कम्प्युटर/लॅपटॉप | म्युझिक सिस्टीम |
| **द्वितीय क्रमांक** | स्मार्ट वॉच | स्मार्ट टी.व्ही. | Exercise Cycle |
| **तृतीय क्रमांक** | पॉवर बँक/ब्युटूथ एअरफोन | वॉटर प्युरीफायर | कलर प्रिंटर/स्कॅनर |

तरी सदरील स्पर्धांमध्ये आपले अधिनस्त सर्व शाळा/महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना जास्तीत जास्त संख्येने सहभागी करून घ्यावे ही विनंती.

मा.स.कळावे.

(आशा राऊत)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका